# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### कोल्हापूर शहराचा पाणी पुरवठा बळकटीकरण व प्रदूषण मुक्त करण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्याबाबत

**(१) १०७५ (२३-१२-२०१४). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या विशेष सहाय्य निधी अंतर्गत कोल्हापूर शहराचा पाणी पुरवठा बळकटीकरण आणि उध्दव प्रदूषण मुक्त करणेसाठी ३५.४१ कोटीची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अंतर्गत कोल्हापूर महानगरपालिकेने पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे सादर केलेल्या प्रस्तावास मंजूरी मिळाली आहे काय,

(३) असल्यास, वरील विषयाच्या अनुषंगाने महानगरपालिकेने सादर केलेल्या ‘कोल्हापूर शहरातील १२ नाल्यातील सांडपाणी अडवून वळवणे या कामांचा समावेश असून त्यास मंजूरी देण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांनी शेतीच्या अधिवेशनात आश्वासन दिलेले असून त्यांस मंजूरी प्राप्त झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०३-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

रु.३५.८५ कोटी इतक्या निधीची तरतुद राज्याच्या विशेष सहाय्य निधी अंतर्गत सन २०१२-१३ च्या अर्थ संकल्पात करण्यात आली होती.

(२) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे तत्कालीन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत गठीत राज्यस्तरीय सनियंत्रण व समन्वय समितीची २७ वी बैठक दि. ३/१२/२०१३ रोजी व २८ वी बैठक १८/१२/२०१३ रोजी संपन्न झाली दि. ३/१२/२०१३ रोजीच्या १४४८९ २७ व्या बैठकीत कोल्हापूर शळराच्या पाणी पुरवठा बळकटी करण्याच्या प्रस्तावास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून तांत्रिक मंजूरी घेण्याच्या अटीवर मंजूरी दिलेली होती. तसेच दि. १८/१२/२०१३ रोजीच्या २८ च्या बैठकीत पाणी पुरवठा व पंचगंगा नदीचे

प्रदुषण रोखणेकरीताच्या शहरातील १२ नाले अडवणे व वळवणे या दोन्ही भागातील कामे विशेष बाब म्हणून मंजूर करण्यात आलेल्या रु. ३५.८५ कोटी रक्कमेतून पूर्ण होतील या दृष्टीने प्रस्ताव नव्याने तयार करुन प्रस्तावास तांत्रिक मंजूरी घेणे या अटीच्या अधिन राहून प्रस्तावास तत्वत: मान्यता दिलेली होती.

(३) व (४) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत कोल्हापूर शहराच्या मलनि:सारण प्रकल्पास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. अमृत.२०१७/प्र.क्र.२७/नवि-३३, मंत्रालय मुंबई-४०००३२ दि.८/२/२०१७ मध्ये अन्वये रु.७२.४७ कोटी इतक्या निव्वळ किंमतीस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदर मंजूरी प्रकल्पामध्ये नाला अडवणे, वळवणे व शुध्दीकरण करणे तसेच फायटोराईट प्रक्रियेद्वारे नाल्यातील सांडपाणी शुध्दीकरण करणे या कामांसाठी आहे.

---

**राष्ट्रीय फेरीवाला धोरणानुसार विस्थापितांच्या पुनर्वसनासाठी हॉकर्स झोन तयार करण्याबाबत**

**(२) ७१२६ (०७-०४-२०१५). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय फेरीवाला धोरणानुसार विस्थापितांच्या पुनर्वसनासाठी हॉकर्स झोन तयार करणार असल्याची घोषणा होऊन चार वर्षे उलटली तरी असे हॉकर्स झोन तयार न झाल्यामुळे कोल्हापूर शहरातील मध्यवर्ती बसस्थानक, पापाची तिकटी स्टेशन रोड, शिवाजी चौक, रंकाळा स्टँड येथील फेरीवाल्यांचे पुनर्वसन न झाल्याने त्यांनी दुसरीकडे दुकाने थाटल्यामुळे वाहतूकीची कोंडी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या फेरीवाल्यांच्या पुनर्वसनासाठी हॉकर्स झोन अद्यापपर्यंत तयार करण्यात न येण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर हॉकर्स झोन तयार करुन या फेरीवाल्यांचे पुनर्वसन करण्याकरित शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०३-२०१७)** :(१) हे खरे हे.

(२) व (३) शहरातील सर्व फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करण्यात आले असून त्यांचे पुनर्वसनाबाबत हॉकर्स झोन तयार करण्याबाबतची कार्यवाही सरु करण्यात आली होती. फेरीवाला समितीमार्फत शहरातील ४ विभागीय कार्यालयामार्फत प्राथमिक झोन तयार करण्यात आले होते. सदर झोनबाबत फेरीवाले व शहर फेरीवाला समिती यांच्यामध्ये काही जागाबाबत मतभेद होते त्यामुळे निश्चिती करण्यास विलंब झाला.

राज्य शासनाने दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी पथविक्रेता (उपजिवेकेने संरक्षण व पथविक्री विनियम) नियम २०१६ प्रसिध्द केला आणि सदर अधिनियमातील तरतुदीनुसार पथविक्रेता उपजिविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन (महाराष्ट्र) योजना २०१७ दिनांक ९/१/२०१७ रोजी राज्य शासनाने प्रसिध्द केली.

त्यानुसार नव्याने नगर पथविक्रेता समितीच्या सदस्यांची निवडे करुन समिती गठीत करण्याबाबतची कार्यवाही कोल्हापूर महानगरपालिकेकडून सुरु आहे. त्यानंतर संपूर्ण फेरीवाल्यांचे सर्वेक्षण, पथविक्रेता प्रमाणपत्र व ओळखपत्र देण्याबाबतची कार्यवाही तसेच नगर पथविक्रेता समितीच्या मान्यतेने नो हॉकर झोन व हॉकर झोन यांचे वर्गिकरण करण्यात येणार आहे.

---

**चुनाभट्टी (कुर्ला भाग ३) मुंबई येथील ए.एच.वाडिया ट्रस्टची जागा शासनाच्या ताब्यात घेऊन पुर्नविकास करण्याबाबत**

**(३) ३६५६९ (२१-०१-२०१६). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चुनाभट्टी (कुर्ला भाग ३) मुंबई येथील जमीन ए.एच.वाडिया ट्रस्ट यांच्या मालकीची असून या जागेचा ताबा १००-१५० वर्षापासून इमला मालिक यांच्याकडे असून मालमत्ता पत्रकात इमला मालिक म्हणून नोंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेवरील चाळी जीर्णावस्थेत असून त्यांना महानगरपालिकेतर्फे धोकादायक असल्याच्या नोटीसा पाठविण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इमला मालिक सदर चाळींचा पुर्नविकास करण्यास तयार असताना, ए.एच.वाडिया ट्रस्ट इमला मालकांना ना-हरकत देत नसून सदर ट्रस्टची जागा शासनाच्या ताब्यात घेऊन पुर्नविकास करण्यात येईल असे मा.मुख्यमंत्री यांनी जाहिर केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०२-२०१७) :**(१) चुनाभट्टी, कुर्ला भाग (३) मुंबई येथे A.H.Wadia Trust चे मालकीच्या जमिनी असून या जमिनीवर झोपडपट्टी आहे, हे खरे आहे. या झोपड्या/इमला मालकाच्या ताब्यात आहेत. मात्र, नक्की गेल्या किती वर्षापासून आहेत याबाबत निश्चित विधान करता येणार नाही.

(२) सदर जागेवरील इमले जीर्ण अवस्थेत असून कॉर्पोरेशने पुर्नविकासासाठी नोटिसा ट्रस्टला दिलेल्या आहेत.

(३) होय.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टीने बाधित क्षेत्राचे Cluster निहाय GPS-ETS झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत पूर्ण करण्यात आले असून साधारणत: ८१६५ एकर क्षेत्र झोपडपट्टीने बाधित आहे. त्यापैकी सुमारे ६४३५ एकर क्षेत्राचे मालकीहक्क अद्यावत करण्यात आले असून त्यापैकी ५१३ एकर क्षेत्रावर वसलेल्या झोपडपट्ट्या खोती जमिनीवर वसलेल्या आहेत. या क्षेत्रापैकी भूसंपादनाचे कार्यवाहीस पात्र ठरत असलेले क्षेत्र ४०७.६१ एकर इतके असून सदर क्षेत्राच्या भूसंपदानाची कार्यवाही प्राधिकरणाकडून सुरु करण्यात आली आहे.

त्याकरीता संपादित करावयाच्या क्षेत्राची संयुक्त मोजणी करण्यासाठी भूसंपदानाचे ४८ प्रस्ताव तयार करुन संबंधित नगर भूमापन अधिकारी यांचेकडे पाठविण्यात आले आहेत. त्यामध्ये ९५ एकर जमिन अंर्तभूत आहे. त्यापैकी ८ प्रकरणामध्ये आकारण्यात आलेली मोजणी फी रक्कम रु.६८,०७,०००/- संबंधित नगर भूमापन अधिकारी यांचेकडे भरणा करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसईच्या पश्चिम किनारपट्टीवरील मच्छिमाऱ्यांना त्रास देणाऱ्या पोलिसांवर कारवाई करण्याबाबत**

**(४) ३९८६८ (२०-०५-२०१६). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसईच्या पश्चिम किनारपट्टीवर मोठ्याप्रमाणात मत्स्यव्यवसाय चालत असून सागरी सुरक्षितेसाठी तैनात केलेल्या पोलीसांकडूनच मच्छीमारांची लुटमार होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच गस्तीवर असलेले पोलीस मच्छीमार बोटींना अडवून त्यांच्याकडील मासे काढून घेत असल्याच्या अनेक तक्रारी मच्छिमारांनी कोळी युवा शक्ती या मच्छीमारांच्या संघटनेकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन मच्छिमारांना त्रास देणा-या पोलीसांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०३-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) वसई पश्चिम किनारपट्टीच्या पोलीस ठाण्यात पोलीसांकडून मच्छिमारांची लूटमारीबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार दाखल नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महादेव कोळी जमातीला सवलतींसाठी संरक्षण देण्याबाबत**

**(५) ४६९७२ (२९-०४-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महादेव कोळी जमातीला सवलतींसाठी संरक्षण देण्याकरिता शासनाचे सामान्य प्रशासन विभागामार्फत शासन परिपत्रक बी.बी.सी. २०१५/प्र.क्र.२७६ ए/१५/१६-ब मंत्रालय, मुंबई दिनांक २१ ऑक्टोबर, २०१५ नुसार राज्यातील सर्व विभागांचे खाते प्रमुखांना सूचना निर्गमित केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनानुसार संबंधित कर्मचारी अकोला येथील परिवहन विभागाचे कार्यालयात गेले असतांना त्यांना सेवेत रुजू करुन घेण्यास नकार देण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून काय कार्यवाही करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, सदर परीपत्रकाची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाकडून सविस्तर व सुस्पष्ट सूचना निर्गमित करण्यात येणार किंवा कसे तसेच नेमकी काय कारवाई करणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०३-२०१७) :**(१) होय.

(२), (३) व (४) बाबत सदर कम्रचारी यांची नियुक्ती दिनांक १५.६.१९९५ नंतरची असल्याने व त्यांचा अनुसूचित जमातीचा दाखला अवैध ठरल्याने, तसेच मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी सदर प्रकरणाबाबत दि.३१.७.२००९ रोजी दिलेल्या आदेशान्वये विभागीय आस्थापनेने दि.११.८.२००९ अन्वये सदर कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त करण्यात आली आहे. अशा प्रकारे दि.२१.१०.२०१५ चा शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वीच संबंधित कर्मचाऱ्याची सेवा समाप्त करण्यात आली आहे.

दि.१५.६.१९९५ नंतर दि.१७.१०.२००१ पर्यंत या कालावधीत अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्य आधारे शासन सेवेत नियुक्त झालेल्या ज्या कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले आहे किंवा ज्या कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र अद्यापपर्यंत सादर केलेले नाही, त्यांच्या सेवेस संरक्षण देण्याबाबत दि.४.३.२०११ च्या शासन निर्णयान्वये तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या मंत्रीगटाच्या शिफारशीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. यास्तव सदर मंत्रीगटाने सादर केलेल्या अहवालासंदर्भात शासनाचा पुढील निर्णय होईपर्यंत अशा कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्यात येऊ नयेत अथवा त्यांना शासन सेवेतून निलंबित करण्यात येऊ नये, असा निर्णय शासन परिपत्रक दि.२१.१०.२०१५ अन्वये देण्यात आला आहे. परंतु दि.२१.१०.२०१५ पूर्वीच अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरल्याने ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना शासन सेवेतून सेवामुक्त करण्यात आले आहे. अशा कर्मचाऱ्यांना शासन सेवेत पुर्नस्थापित करण्याबाबत कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.

तसेच शासन परिपत्रक दि.२१.१०.२०१५ च्या परिपत्रकाविरुध्द मा.उच्च न्यायालय मुंबई, नागपूर खंडपीठ येथे रिट याचिका क्र.६२४७/२०१५ दाखल केली आहे. या प्रकरणी मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी दिनांक २५.४.२०१६ च्या आदेशान्वये शासनाच्या दिनांक २१.१०.२०१५ च्या परिपत्रकास स्थगिती दिलेली आहे.

---

**परळी (जि.बीड) तालुक्यात वाढत असलेल्या चोऱ्यांच्या घटनांबाबत**

**(६) ५०२०८ (२४-०५-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी (जि. बीड) तालुक्यात दिवसेंदिवस चोऱ्यांच्या घटना वाढत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परळी तालुक्यातील चोऱ्यांच्या घटनांना आळा घालण्यासाठी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१७) :**(१) पोलीस स्टेशन परळी शहर हद्दीत माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये (०७) चोरीच्या घटना घडलेल्या आहेत. त्यापैकी (०४) गुन्हे उद्यडकीस आले असून त्यातील (१४) आरोपींना अटक करुन त्यांच्याकडून २,३८,५००/- रुपये जप्त करण्यात आले असून दाखल गुन्ह्यापैकी (०४) गुन्हे तपासावर असून (०१) गुन्ह्यात दोषारोपपत्र पाठविले असून (०२) गुन्ह्यात अखेरी रिपोर्ट पाठविण्यात आले आहे.

पोलीस स्टेशन परळी शहर हद्दीत सन २०१५ मधील माहे फेब्रुवारी मध्ये (०८) गुन्हे दाखल असून त्यापैकी (०२) गुन्हे उघडकीस आले असून सदर गुन्ह्यात (०४) आरोपींना अटक करुन त्यांच्याकडून ९०००/- रुपये जप्त करण्यात आले आहे.

तत्सम कालावधीशी तुलना करता माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये (०१) गुन्ह्यांची घट झाली आहे.

(२) पोलीस स्टेशन परळी शहर हद्दीत चोऱ्या सारखे प्रकर होऊ नये म्हणून नाईट राऊंड करीता (०७) पोलीस कर्मचारी व (०१) पोलीस अधिकारी, मार्शल पेट्रोलिंग साठी (०२) पोलीस कर्मचारी व विशेष पथकाचे (०४) पोलीस कर्मचारी यांची नियुक्ती करुन चोऱ्या सारखे घटना घडू नयेत म्हणून नियमित शहरात पेट्रोलिंग करण्यात येते.
(३) विलंब झालेला नाही.

---

**राज्यातील अनुसूचित जाती संवर्गात समाविष्ट जातींना लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण मिळाणे करिता आरक्षणाची अ,ब,क,ड वर्गवारी करण्याबाबत**

**(७) ५१५४१ (२८-०४-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुसूचित जाती संवर्गात समाविष्ट जातींना लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण मिळाणे करिता आरक्षणाची अ,ब,क,ड अशाप्रकारे वर्गवारी करावी अशी मागणी क्रांतीगुरु लहूजी साळवे विकास परिषद या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी निवेदनाव्दारे मा. सामाजीक न्याय मंत्री यांना दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणात अनुसूचित जाती संवर्गात समाविष्ट असलेल्या जातीच्या लोकसंख्येच्या आधारे वर्गीकरण करण्याबाबत शासनाने केंद्राकडे शिफारस केली आहे काय,
(३) असल्यास, शिफारशींचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, अद्यापर्यंत केंद्राकडे शिफारस न करण्याचे सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०३-२०१७) :**(१) होय.

(२), (३) व (४) अनुसूचित जाती व प्रवर्गामध्ये अनेक जातींचा समुह असुन ते संविधानिक आरक्षण आहे. तसेच जात निहाय लोक संख्येची जनगणना करता येत नाही त्यामुळे लोकसंख्येच्या आधारे अनुसूचित जात या प्रवर्गाचे अ, ब, क, ड वर्गीकरण करण्याबाबतची कोणतीही शिफारस राज्य शासनाने केंद्र शासनाकडे केलेली नाही.

---

**जालना (जि.जलना) येथील एकाच कुटूंबातील सहा जण बेपत्ता झाल्याबाबत**

**(८) ५१८१८ (२०-०५-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना (जि.जालना) येथील एकाच कुटूंबातील सहा जण नऊ दिवसापासून बेपत्ता असल्याची घटना दिनांक १४ फेब्रुवारी, २०१६ रोजी निदर्शनास आली असून याबाबतची तक्रार तालुका पोलिस स्टेशनलाही नोंदविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी दि. १२/०२/२०१६ रोजी जालना पोलीस स्टेशन येथे मिसिंग क्र. ०३/२०१६ दाखल करण्यात आला आहे. त्यानुषंगाने साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आलेले असून बेपत्ता इसमांचे मोबाईल फोन हस्तगत करुन त्यांचे टॉवर लोकेशन घेण्यात आलेले आहेत. सदर बेपत्ता व्यक्ती शिर्डी येथे कामानिमित्ता गेले असल्याचे व त्यातील एक व्यक्ती आजारपणामळे शिर्डी हॉस्पीटल येथे उपचार घेत असल्याचे समजल्याने त्यांचा शोध घेण्यासाठी पोलीस तपास पथक रवाना करुन स्थानिक पोलीसांचे मदतीने शोध घेण्यात आला परंतु बेपत्ता व्यक्ती ह्या अद्याप मिळून आलेल्या नाहीत. सदर बेपत्ता व्यक्तीचा शोध घेण्यात येत आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**राज्यातील मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे, उस्मानाबाद, सोलापूर, तारापूर आणि ठाणे ही भूकंप सदृश संवेदनशील शहरे असल्याबाबत**

**(९) ५३६७४ (२२-०८-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **भूकंप पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे, उस्मानाबाद, सोलापूर, तारापूर आणि ठाणे ही भूकंप सदृश संवेदनशील शहरे असल्याचे भारतीय मानक ब्युरोच्या (बीआयएस) घोषित केल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहरामध्ये मोठमोठ्या उंच इमारती असल्याने त्यांना मोठा धोका निर्माण होऊ शकतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भारतीय मानक ब्युरोच्या संकेतानंतर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१०-०२-२०१७)** :(१) होय.
(२) होय.
(३) महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार स्थापन झालेली तांत्रिक समती मुंबई शहरातील ७० मीटरपेक्षा जास्त उंचीच्या इमारतींचे प्रस्ताव इमारतींचे स्ट्रक्चरल डिझाईनचे NBC व IS च्या कोडमध्ये नमूद मानकांनुसार छाननी करतात. या समितीच्या निर्णयानुसारच ७० मीटरपेक्षा जास्त उंचीच्या इमारतींच्या बांधकामांना परवानगी दिली जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## संराडी (ता.भिवापूर, जि.नागपूर) गावातील मनोरूग्ण रामदास भोयर यांच्या जमीनीच्या व्यवहारामध्ये अफरातफर करण्यात आल्याबाबत

**(१०) ५४०११ (२३-०८-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संराडी (ता.भिवापूर, जि.नागपूर) गावातील मनोरूग्ण रामदास भोयर यांचा नावे असलेली बेसा बेलतरोडी घोगली परिसरातील एक एकर जमीन विक्री व्यवहारात विजय तालेवार, राजु जैस्वाल, गोपाल भिवाजी अंगलेकर आणि इतर आरोपींनी अफरातफर केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर शहरातील परिमंडळ-२ चे पोलीस उपायुक्त श्री. संजय लाटकर व त्यांच्या पोलीस अधिकाऱ्यांनी गुन्हयाचा व्यवस्थित तपास न करता प्रकरण बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीअंती दोषी आढळणाऱ्या तत्कालीन पोलीस अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०३-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी फिर्यादीचे पतीस गुप्तपणे व गैरपणे अपहरण करुन बळजबरीने शेतीचे बनावट मौल्यवान दस्तऐवज तयार करुन आरोपीने स्वत:चे फायद्याकरीता उपयोगात आणले तसेच फिर्यादी व फिर्यादीचे पतीस शिवीगाळ करुन जिवानिशी मारण्याची धमकी दिलेल्या तक्रारीवरुन सदर पोलीस स्टेशन, नागपूर शहर येथे पाच आरोपींविरुध्द अपराध क्रमांक ६२/११ क. १२० (ब), ४२३, ४६७, ४६८, ४७१, ३६५, २९४, ५०६, ३४ भादवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्यातील पाच आरोपीपैकी चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर चारही आरोपींना नंतर मा.न्यायालयाने जामिनावर मुक्त केले आहे. तसेच सदर गुन्ह्यातील उर्वरीत एका आरोपीने मा.उच्च न्यायालयात अटकपुर्व जामिनासाठी अर्ज केला असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर येथील डीएनआर टॅव्हल्सच्या मालकाने बनावट पोलीस अधिकारी बनून टॅव्हल्सवर धाड टाकून प्रवाशांची लूटमार केल्याबाबत**

**(११) ५५५१७ (२३-०८-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर येथील डीएनआर ट्रॅव्हल्स या दररोज चंद्रपूर-नागपूर, नागपूर-चंद्रपूर मार्गावर प्रवाशांना ने-आण करणाऱ्या ट्रॅव्हल्स बसेसव्दारे नागपूरहून चंद्रपूर येथे मोठया प्रमाणात अवैधरित्या दारू आणण्यात येत असून सदर ट्रॅव्हल्सच्या मालकानेच दिनांक २७ मे, २०१६ रोजी वा त्यादरम्यान बनावट पोलीस अधिकारी बनून ट्रॅव्हल्सवर धाड टाकून दारूसाठयासह प्रवाशाजवळ असलेल्या सामानाची व पैश्यांची लूटमार केल्याचे दिनांक ५ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पोलीसांच्या संगनमताने ट्रॅव्हल्सच्या बसेसच्या माध्यमातून दारूबंदी असलेल्या चंद्रपूर जिल्हयात दारू आणून त्याची अवैध विक्री करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१७) :**(१) चंद्रपूर येथील डीएनआर ट्रॅव्हल्स या दररोज चंद्रपूर-नागपूर, नागपूर-चंद्रपूर मार्गावर प्रवाशांना ने-आण करणाऱ्या ट्रॅव्हल्स बसेसद्वारे नागपूरहून चंद्रपूर येथे मोठ्या प्रमाणात अवैधरित्या दारु आणण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. तथापि सदर ट्रॅव्हल्सच्या मालकानेच दिनांक २७ मे, २०१६ रोजी तोतया पोलीस अधिकारी बनून ट्रॅव्हल्समधील एका प्रवाशाची (फिर्यादी) दारुसाठी असलेली बॅग ट्रॅव्हल्समधून काढून घेऊन आपल्या गाडीत ठेवून प्रवाशाला दमदाटी केल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी फिर्यादीच्या फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन, पडोली येथे अपराध क्रमांक १०८/२०१६ कलम ३८४, ३८५, ४२०, ४१७, १७०, ३४ भांदवि प्रमाणे दिनांक २७/०५/२०१६ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्ह्यात एकूण पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी पाचही आरोपीविरुध्द इस्तेगाशा क्र.२२/२०१६ कलम १०७, ११६ (३) दं.प्र.सं. अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी उक्त आरोपींविरुध्द दोषारोपपत्र मा.न्यायालयात सादर करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई व इतर शहरामधील न्यायालयीन इमारतींची दुरवस्था झाल्याबाबत

**(१२) ५५७६८ (२३-०८-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई व इतर शहरामधील न्यायालयीन इमारतींची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, न्यायालयीन इमारतींच्या बांधकामामध्ये प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, न्यायालयीन इमारतींमध्ये सोयी सुविधा उपलब्ध करण्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन इमारतींच्या दुरुस्तीबाबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्याता येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१७) :**(१) अंशतः खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही, राज्यातील न्यायालयीन इमारतींच्या दुरुस्तीबाबतचे तसेच नवीन इमारती बांधण्यंचे प्रस्ताव मा.उच्च न्यायालयाकडून शासनास प्राप्त झाल्यानंतर सदर प्रस्तावांची विहीत मार्गाने छाननी करुन आवश्यकतेनुसार सार्वजनिक बांधकाम विभाग, नियोजन विभाग, वित्त विभाग व सचिव समितीची मान्यता घेऊन प्रशासकीय मान्यता व निधीची उपलब्धता करण्यात येते. मा.उच्च न्यायालायांकडून प्राप्त होणाऱ्या नवीन इमारतींच्या बांधकामाच्या प्रस्तावामध्ये सर्व सोयी सुविध असतील याची कटाक्षाने दखल घेण्यात येते. त्यामुळे न्यायालयीन इमारतींच्या बांधकामामध्ये दुर्लक्ष केले जाते हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईत ड्रोनवर बंदी घातल्याबाबत

**(१३) ५५८९६ (२३-०८-२०१६). ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई पोलिसांचे ड्रोन बंदीचे पत्रक पुन्हा नव्या मुदतीसह लागू केले जात असून, मुंबईत फोटोग्राफी करणारे एखादे ड्रोन सापडलेच तर त्यावर नेमकी कोणती कारवाई करावयाची

याबाबत पोलीस यंत्रणा संभ्रमात असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विविध सुरक्षा यंत्रणा बरोबरच नागरी क्षेत्रातही उपयुक्त ठरणाऱ्या ड्रोनवर बंदी घातल्याने अडचणी निर्माण झाल्या असून त्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) बृहन्मुंबई पोलीस हद्दीत ड्रोन उड्डाण करण्यास प्रतिबंधात्मक आदेश दर ३० दिवसांकरिता पारीत केले जातात. मुंबईमध्ये सदर कालावधीत ड्रोन उड्डाण केल्याचे निदर्शनास आल्यास त्यावर भारतीय दंड प्रक्रिया संहिता कायदा सन १८६० मधील कलम १८८ अन्वये कारवाई केली जाते.

नागरी क्षेत्रात उपयुक्त ठरणाऱ्या ड्रोनवर बंदी घातल्याने कोणती अडचण निर्माण झाली आहे याबाबत अभिलेखी कोणतीही नोंद नाही.

---

**शिरुर (जि.पुणे) येथील न्यायालयाची इमारत मोडकळीस आल्याबाबत**

**(१४) ५६३५२ (२४-०८-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरुर (जि.पुणे) येथील न्यायालयाची इमारत अत्यंत जीर्ण झाली असून मोडकळीस आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिरुर न्यायालयाकडे स्वमालकीची विस्तीर्ण जागा असून या जागेत न्यायालयाची अद्यायावत इमारत उभारावी अशी मागणी शिरुर बार असोशिएशन यांनी शासनाकडे करुन तसा प्रस्ताव उच्च न्यायालयाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०१-२०१७) :**(१) शिरुर, जिल्हा पुणे येथील न्यायालयीन इमारत जीर्ण झालेली आहे. परंतु आजमितीस मोडकळीस आलेली नाही.
(२) होय. शिरुर न्यायालयाकरीता विस्तीर्ण जागा मंजूर झालेली असून या जागेत न्यायालयाची अद्यायावत इमारत उभारण्याकरिता शिरुर बार असोशिएशन यांनी जिल्हा न्यायालय, पुणे या कार्यालयास प्रस्ताव दिला. सदरचा प्रस्ताव जिल्हा न्यायालयाने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविला आहे. सदर प्रस्ताव मा.उच्च न्यायालय यांच्या विचाराधीन आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर ग्रामीण भागात तीन वर्षाच्या कालवधीत दाखल करण्यात आलेल्या गुन्हयातील ८ टक्के आरोपीना शिक्षा झाल्याबाबत**

**(१५) ५७८६३ (२३-०८-२०१६). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर ग्रामीण भागात माहे जानेवारी, २०१३ ते मार्च, २०१६ या तीन वर्षाच्या कालावधीत चोरी, बलात्कार, अपहरण, दरोडा, अत्याचार, चेनस्नॅचींग, खून व आत्महत्या या प्रकरणात १२ हजाराच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले असून प्रत्यक्षात मात्र ८ टक्के आरोपींनाच शिक्षा झाल्याचे माहे मे, २०१६ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाढत्या गुन्हेगारींच्या घटनांवर अंकुश लावण्याकरीता कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१७) :**(१) नागपूर ग्रामीण जिल्हयात सन २०१३ ते मार्च, २०१६ या तीन वर्षाचे कालावधीत चोरी, बलात्कार, अपहरण, दरोडा, अत्याचार, चैनस्नॅचींग, खून व आत्महत्या या प्रकरणी एकूण १२३६९ गुन्हे दाखल आहेत. सन २०१३ ते मार्च, २०१६ या कालावधीत मा.न्यायालयात ८३७२ गुन्हयात सुनावणी होऊन त्यामध्ये १०७१ गुन्हयात आरोपींना शिक्षा झालेली आहे. मा.न्यायालयात सुनावणी होऊन निर्णय झालेल्या गुन्हयामध्ये शिक्षा झालेल्या गुन्हयाची टक्केवारी १२.७९ आहे.

(२) नागपूर ग्रामीण जिल्हयात गुन्हयांना आळा घालणे कामी नाकाबंदी, पेट्रोलींग, कोम्बिग ऑपरेशन, सक्रीय गुन्हेगारी व निगराणी बदमाश चेकींग, गुन्हयांचे ठिकाणी परिसराची निश्चीती करुन त्या-त्या भागात दिवसा व रात्री गस्त लावण्यात येते, सक्रिय गुन्हेगारी व निगरानी बदमाश चेक करण्यात येत आहे.

स्त्री अत्याचार संबंधी गुन्हयांना आळा घालणे कामी महिला पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचेकडून गस्त लावण्यात येते, शाळा, कॉलेज व महिला नौकरी करीत असलेल्या ठिकाणी सुरक्षेबाबत सुचना देण्यात येतात. दामिनी पथकाकडून भेट देवून प्रतिसाद ॲप डाऊनलोड व हेल्पलाईनचा उपयोग करण्याबाबत सुचना देण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिगोली जिल्हयातील देवडानगर भागात असलेल्या एसबीआय बँकेचे एटीएम मशिन गॅस कटरने कापून त्यातील लाखो रुपये चोरट्यांनी पळविल्याबाबत**

**(१६) ५८१३९ (२३-०८-२०१६). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिगोली जिल्ह्यातील देवडानगर भागात असलेल्या एसबीआय बँकेचे एटीएम मशिन गॅसकटरने कापून त्यातील लाखो रुपये अज्ञात चोरट्यांनी पळवीले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली तसेच जिल्ह्यात एटीएम मशीन फोडण्याचे प्रकार दिवसें दिवस वाढत असल्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०३-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन हिंगोली शहर येथे गु.र.नं. १०/२१०१६ भा.दं.वि. कलम ४५७, ३८०, ४२७, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करुन सदर गुन्ह्यात ४ आरोपींना अटक करुन त्यांच्याकडून ३,७७,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. इतर ५ आरोपी अद्याप फरार असल्याने त्यांचा शोध होण्यात येत आहे. तसेच अटक ४ आरोपी विरुध्द सीआरपीसी कलम १९९ प्रमाणे कार्यवाही करुन त्यांच्या विरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

दिवसेंदिवस एटिएम मशीन फोडण्याचे प्रकार वाढत असल्याने रात्रीचे पेट्रोलिंग करणाऱ्या कर्मचाऱ्यास वळोवेळी शहरात लावलेले एटिएम चेक करुन तेथील रक्षकास वेळोवेळी चेक करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच ज्या ठिकाणी रक्षक नेमण्यात आलेले नाहीत त्या बँकचे मॅनेजर यांना लेखी पत्र देऊन रक्षक नेमणेबाबत कळविले आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

## नांदेड शहराच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मटका, जुगार या सारखे अवैध धंदे सुरु असल्याबाबत

**(१७) ५८२४८ (२३-०८-२०१६). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहराच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मटका, जुगार आणि क्रिकेट सट्टा सुरु असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कारवाई करण्यासंदर्भात संबंधित पोलीस निरीक्षकांना निवेदन देण्यात आले असूनही याबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१७) :**(१) पोलीस स्टेशन शिवाजीनगर, नांदेड हद्दीत माहे मे, २०१६ मध्ये चोरुन लपून मटका, जुगार चालवित असल्याची माहिती मिळताच दोन आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(२) व (३) सदर प्रकरणी तक्रार प्राप्त होण्यापुर्वी पोलीस स्टेशन शिवाजीनगर, नांदेड येथे गु.र.नं. १२१/२०१६ महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम कलम १२ (अ) अन्वये दि.०४/०५/२०१६ रोजी १ गुन्हा दाखल करण्यात आला होता. तसेच दि. २८/०५/२०१६ रोजी गु.र.नं. १३८/२०१६ महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम कलम १२ (अ) अन्वये आणखी १ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यामध्ये १ आरोपीस अटक करुन त्यांच्याविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदर दोन्ही गुन्हे न्यायप्रविष्ठ आहेत.

तसेच, जानेवारी ते ऑगस्ट २०१६ पर्यंत महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियमाप्रमाणे पोलीस स्टेशन शिवाजीनगर नांदेड येथे एकूण २१ गुन्हे दाखल करुन दोषी व्यक्तीविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**राज्यातील पोलिसांच्या विविध मागण्याबाबत**

**(१८) ५८८७० (२३-०८-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत पोलिसांचे १२ ते १६ तास काम करण्याच्या विरोधात पोलिसांच्या कुटुंबियांनी केलेल्या आंदोलनाची दखल घेत चेंबूर येथील पोलिस स्टेशन मधील पोलिसांचे प्रायोगिक तत्वावर कामाचे ८ तास करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१६ च्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलिस स्टेशनमध्ये करण्यात आलेल्या प्रायोगिक तत्वावरील प्रयोग यशस्वी झाला आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील पोलिसांना ८ तास नोकरी असावी व त्याहून अधिक तास काम केल्यास ओव्हर टाईम मिळावा, सुधारित वेतन निश्चिती मिळावी, हक्काची घरे मिळावीत, महाराष्ट्र पोलीस दलाचे वेतन इतर राज्याप्रमाणे करावे, पोलीसांच्या कुंटूबियांना सर्व प्रकारच्या आजारांवर मोफत उपचार मिळावेत, निवृत्त पोलिसांना वैद्यकीय सुविधेचा लाभ मिळावा, पोलिसांच्या मुलांना पोलीस भरतीत १० ते १५ टक्के आरक्षण मिळावे तसेच पोलीस संघटना स्थापन करण्यास परवानगी मिळावी इत्यादी मागण्या वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०३-२०१७) :**(१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३), (४) व (५) गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक : टीईएक्स-०३१०/ प्र.क्र.६१३/पोल-५ अ, दिनांक २५-८-२०११ अन्वये राज्यातील पोलीसांना वेतनासोबत आहारभत्ता मोबदला दिला जातो व साप्ताहिक सुट्टी मोबदल्याची देयके स्वतंत्ररित्या सादर केली जातात. सहाव्या वेतन आयोगानुसार सर्व पोलीस कर्मचाऱ्यांना वेतन अदा केले जाते. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक. संकीर्ण-२०१४/प्र.क्र.४०/२०१४ कोषा प्रशा-४ दिनांक ९-७-२०१४ अन्वये शासकीय सेवेच्या अंतिम वर्षात पदार्पित शासकीय अधिकारी / कर्मचारी व नुकतेच सेवानिवृत्त झालेले शासकीय अधिकारी / कर्मचारी व कुटुंबनिवृत्तीवेतनधारक यांच्यासाठी वैद्यकीय गट विमा योजना लागू करण्यात आली आहे. पोलीस शिपाई पदाच्या भरतीसंदर्भात गृह विभाग शासन निर्णय क्रमांक :लवेसु-३६१३/प्र.क्र.२३८/पोल ५ अ, दिनांक २२ ऑगस्ट, २०१४ अन्वये पोलीस कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना पोलीस शिपाई भरतीमध्ये ५ टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे.

---

## औरंगाबाद विमानतळाच्या विस्तरीकरणाबाबत

**(१९) ५८९६६ (२३-०८-२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद विमानतळाच्या विस्तारीकरणाचा प्रश्न गत तीन वर्षापासून शासन स्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विमानतळ विस्तारीकरणाच्या जमीन मोजणीकरिता विमानतळ प्राधिकरणाकडे आवश्यक असलेल्या निम्म्या रक्कमेची मागणी महसूल प्रशासनाने केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मोजणीचे शासकीय शुल्क कोणी भरावे यावरुन विमानतळ विस्तारीकरणाचा प्रलंबित असून सदर प्रश्न मार्गी लावण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-१२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय, विमानतळ विसतारीकरणासाठी आवश्यक असलेल्या जमीनीच्या भूसंपादन मोजणीकरीता निम्मे मोजणी शुल्क देण्याबाबत विमानपत्तन प्राधिकरण, चिखलढाणा, औरंगाबाद यांना कळविले आहे तथापि विमानतळ विस्तारीकरणासाठी आवश्यक असलेली जमीन शुल्क मुक्त व अतिक्रमणरहित असावी अशी मागणी विमानपत्तन प्राधिकरण यांनी केली आहे. त्यामुळे मोजणी शुल्क दिलेले नाही.

या अनुषंगाने विमानतळ विस्तारीकरण भूसंपादन प्रकरणी कार्यवाही करण्यासाठी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना संपादन संस्था म्हणून प्राधिकृत करण्याची बाब शासनाची विचाराधीन आहे.

या संदर्भात औरंगाबाद येथे मा.मंत्री मंडळ बैठकीत दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ रोजी विमानतळ धावपट्टी बांधकामासाठी भूसंपादन करणे व भूसंपादनावरील सर्व खर्च राज्य शासन करेल यासाठी २०० कोटी मंजूर करणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडून प्रस्ताव मागविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विविध महामंडळे आणि प्राधिकरणाच्या देना बँकेतील कोट्यवधी**
**रुपयांच्या मुदत ठेवींत झालेला गैरव्यवहार**

**(२०) ६०२१४ (२६-०८-२०१६). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या विविध महामंडळे/प्राधिकरणांकडून मुदत ठेवी बॅकाना मिळवून दयावयाच्या बॅंकेच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने बनावट पावत्या आणि मुळ मुदत ठेवी पावत्यांचा गैरवापर करुन गैरव्यवहार करणाऱ्या दलालांचे मोठे रॅकेट मुंबईत कार्यरत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील देना बॅंकेचे अधिकारी आणि दलालाच्या संगनमताने झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अधिकारी व दलालावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१२-२०१६) :**(१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

मुंबई महानगर क्षेत्र विकास महामंडळाची फसवणूक केल्याबाबत एम.एम.आर.डी.ए. यांच्या फिर्यादीवरुन दि.११.०७.२०१४ रोजी मलबार हिल पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.नो.क्र.६०/१४ कलम ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४०९, ४१९, ४२०, १२० (ब) भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करुन, त्याचा तपास आर्थिक गुन्हे दाखल करुन, त्याचा तपास आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई यांच्याकडे वर्ग करण्यात आला होता. त्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या दि.२०.०२.२०१५ रोजीच्या आदेशानुसार सदर गुन्ह्याचा तपास सी.बी.आय.मुंबई यांच्याकडे वर्ग करण्यात आला होता.

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाने विजया बँक, लोखंडवाला शाखेमध्ये रु.९ कोटी मुदत ठेवीमध्ये गुंतवले होते. या प्रकरणी मुदत ठेवीच्या मुळ पावत्या व बनावट कागदपत्रांच्या आधारे ओव्हरड्राफ्ट सुविधेव्दारे अन्य खात्यात वळवून, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाची फसवणूक केल्याबाबत महामंडळाच्या फिर्यादीवरुन दि.०७.०८.२०१४ रोजी एम.आर.ए.मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.नों.क्र.६०/१४ कलम कलम ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४०९, ४२०, १२० (ब) भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करुन, सदर गुन्हयाचा पुढील तपास आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथे गु.नों.क्र.७२/१४ प्रमाणे नोंद केला होता. गुन्ह्याच्या तपासामध्ये बँक अधिकारी, एजंट व लाभार्थी यांनी संगनमताने गुन्हा केला असल्याने निष्पन्न झाले आहे.

सदर गुन्ह्यामध्ये दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्या विरुध्द मा.अति.मुख्य महानगर दंडाधिकारी, ४७ वे न्यायालय, एस्प्लनेड, मुंबई यांच्या न्यायालयात सी.सी.क्र.४७१/पीडब्लु/१६ अनुसार दि.१४.०६.२०१६ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे व गुन्ह्याचा तपास कलम १७३ (८) फौ.दं.प्र.सं. प्रमाणे पुढे सुरु आहे. नमुद गुन्ह्यातील आरोपी नामे अखिलेशकुमार जैन, तत्कालीन शाखा, प्रबंधक, विजयासमृध्दी शाखा, विजया बँक याच्या अटकपूर्व जामीन अर्जाची सुनावणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रलंबित असून गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबई सायन पनवेल टोलचे कंत्राट देण्यात झालेल्या गैरव्यवहारप्रकरणाची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी सुरु असल्याबाबत

**(२१) ६०३५४ (२४-०८-२०१६). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई सायन पनवेल टोलचे कंत्राट देण्यात झालेल्या गैरव्यवहारप्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची राज्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व त्यानुंषगाने दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द करावयाच्या कारवाईची सद्य:स्थिती काय आहे,
(३) अद्याप चौकशी पूर्ण झाली नसल्यास त्याची कारणे काय आहेत व अजून किती कालावधी अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०३-२०१७) :**(१), (२) व (३) सायन-पनवेल महामार्गावरील टोल बुथवरील कामामध्ये व ठेका देण्याच्या कार्यपध्दतीमध्ये सकृतदर्शनी अनियमितता झाल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंध विभागाच्या उघड चौकशीच्या प्रस्तावास शासनाने दि. १० फेब्रुवारी, २०१७ रोजी उघड चौकशीस मान्यता दिलेली आहे.

---

### सावली (जि.चंद्रपूर) येथे विषारी दारू पाशन केल्यामुळे मजूराचा मृत्यू झाल्याबाबत.

**(२२) ६१५४९ (२३-०८-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावली (जि.चंद्रपूर) येथे केबलचे काम करणाऱ्या पाच मजूरांनी दिनांक १६ जून, २०१६ रोजी किसाननगर येथे मोहफुलाची दारू पाशन केल्यामूळे त्याची प्रकृती चिंताजनक झाली असून एका मजूराचा सावली ग्रामीण रूग्णालयात मृत्यू झाला असल्याचे दिनांक १९ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सहा महिन्यापुर्वी किसाननगर येथे दारू पाशन केल्यामूळे दोन जणांचा मृत्यू झाला होता त्यावेळी अवैध दारू विक्री बंद करावी या मागणीसाठी परिसरातील हजारो महिलांनी सावली पोलीस स्टेशनवर मोर्चा काढला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर महिलांना माहे मे, २०१६ च्या सुमारास अवैध दारू विक्रेत्यांनी हल्ला करून गंभीर जखमी केले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त ठिकाणी पोलीस चौकी उभारुन अवैध दारू विक्रीस आळा घालण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री, जिल्हा पोलीस अधिक्षक चंद्रपूर, जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना दिले होते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करून संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच चंद्रपूर जिल्हयातील सावली, सिंदेवाही, ब्रम्हपूरी तालुक्यात मोठया प्रमाणात अवैध दारूची विक्री होत असल्यामूळे संपुर्ण दारूबंदी होण्याकरीता शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१७) :**(१) सावली (जि.चंद्रपूर) येथे केबलचे काम करणाऱ्या पाच मजूरांनी दिांक १७ जून, २०१६ रोजी किसाननगर येथे मोहफुलाची दारु प्राशन केल्यामुळे त्यांची प्रकृती चिंताजनक झाली होती तसेच त्यापैकी एका मजूराचा सावली ग्रामीण रुग्णालयात मृत्यू झाला असल्याचे दिनांक १८ जून, २०१६ रोजी निदर्शनास आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) सदर प्रकरणी फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस स्टेशन, सावली येथे अकस्मात मृत्यू क्रमांक २२/२०१६ कलम १७४ दंप्रसं अन्वये नोंद करण्यात आली असून सदर प्रकरणी समरी तयार करुन मंजूरीस पाठविण्यात आली आहे.

चंद्रपूर जिल्हयातील मुल, सावली, सिंदेवाही, पाथरी, पोंभूर्णा हे पोलीस स्टेशन उपविभाग मुल अंतर्गत येत असून सन २०१६ मध्ये ऑगस्ट अखेर पावेतो अवैध दारु प्रकरणी सदर उपविभागात एकूण ७४४ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्या गुन्हयामध्ये एकूण ८१६ आरोपींना अटक करण्यात आली आहे व एकूण रु.१,५५,८२,७००/- एवढा मुद्देमाल जप्त केलेला आहे.

शासनातर्फे दिनांक १/४/२०१५ पासून चंद्रपूर जिल्हयात दारुबंदी घोषित करण्यात आली आहे. सदर दारुबंदी यशस्वीरित्या अंमलबजावणी करण्याकरीता दिनांक १/४/२०१५ पासून चंदगपूर जिल्हयात दारुबंद मोहीम राबविण्यात येत आहे. चंद्रपूर जिल्हयातील उपविभाग मुल अंतर्गत पोलीस स्टेशन मुल, सिंदेवाही, सावली, पाथ्री, पोंभुर्णा असे एकूण ५ पोलीस स्टेशन आहेत. सदरचे पोलीस स्टेशन हद्दीत बाहेर जिल्हयातून /सीमावर्ती भागातून दारुचा पुरवठा होवू शकतो अशी (१) कानपा (नागभीड) (२) बामणी (नागभीड) (३) तोरगाव वडसा रोड (ब्रम्हपुरी) (४) गांगलवाडी (ब्रम्हपूरी) (५) मुल रोड (गोंडपिंपरी) (६) चांदापूर फाटा (मुल) (७) शिवाजी

चौक (सिंदेवाही) या ठिकाणी (SST) चेक पॉईट लावण्यात आले आहेत. त्या ठिकाणी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे पोलीस स्टेशनमधून अचानक नाकाबंदी लावून आलटून पालटून चेकींग पॉईट लावण्यात येत आहे. अवैध दारु वाहतूक व विक्रीवर आळा घालण्यासाठी प्रत्येक पोलीस स्टेशन पातळीवर तसेच जिल्ह्याचे ठिकाणी स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर येथे भरारी पथकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्री.मनस्मृती या ग्रंथाचे नव्या स्वरुपात प्रकाशन करण्यात आल्याबाबत**

**(२३) ६३३९४ (२२-०८-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने दलित, पीडीत आणि शोषितांना, विशेषतः महिलांना गुलाम बनविण्याचे धडे देणाऱ्या सार्थ श्री.मनुस्मृती या ग्रंथांच्या प्रकाशनास व विक्रीस दहा वर्षापूर्वी बंदी घातली असताना मनुस्मृतीचे नव्या स्वरुपात प्रकाशन करण्यात आले असल्याचे माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आधुनिक युगात मनुस्मृती ग्रंथांचे प्रकाशन करण्यामागील नेमकी कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली करण्यात येत आहे व त्याची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०१-२०१७)** :(१) व (२) श्री.मनुस्मृती या ग्रंथावर बंदी घातल्याने कोणतेही अभिलेख नाहीत. तसेच शासनामार्फत सदर ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आलेले नाही.
तथापि विष्णुशास्त्री बापट यांनी भाषांतरीत केलेले सार्थ मनुस्मृती नावाचे पुस्तक राजेश प्रकाशन, पुणे या खाजगी प्रकाशनाने प्रकाशित केले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मुंबई पुणे या एक्सप्रेस महामार्गावर अनाधिकृत अवजड वाहने उभे असल्याने अपघात घडून अनेक निरपराध माणसे मृत्युमुखी पडत असल्याबाबत**

**(२४) ६३८४८ (२४-०८-२०१६). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मुंबई पुणे या एक्सप्रेस महामार्गावर अनाधिकृत अवजड वाहने उभे असल्याने अपघात घडून अनेक निरपराध माणसे मृत्युमुखी पडत असल्याची घटना माहे जून, २०१६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाहन चालकांना शिस्त लावण्यासाठी विशिष्ट वाहन लेन पध्दत अंमलात आणण्यात येणार आहे काय, तसेच लेन निश्चित केलेल्या वाहनचालकानी शिस्त मोडल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१२-२०१६) :**(१) मुंबई-पुणे हा द्रुतगती मार्ग पोलीस आयुक्त, नवी मुंबई, पोलीस अधिक्षक, रायगड व पोलीस अधिक्षक पुणे(ग्रामीण) यांच्या कार्यक्षेत्रात आहे. यापैकी आयुक्त, नवी मुंबई व पोलीस अधिक्षक, रायगड यांच्या कार्यक्षेत्रात माहे जुन-२०१६ मध्ये अपघात घडल्याचे आढळून आलेले नाही. तथापि, पोलीस अधिक्षक, पुणे (ग्रामीण) यांच्या कार्यक्षेत्रात माहे जानेवारी-२०१६ ते जून-२०१६ या कालावधीत अनधिकृत अवजड वाहने उभी असल्याने ०२ अपघात घडल्याची नोंद असून त्यामध्ये ०२ व्यक्ती मृत्यूमुखी पडल्या आहेत.

(२) वाहतुकीचे नियमन करण्यासाठी स्थानिक पोलीस स्टेशन कडून पोलीस कर्मचा-यांची नेमणूक केली जाते. महामार्ग पोलीस यांच्यासह संयुक्त मोहिम राबविण्यात येते. तसेच वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करणा-या वाहन चालकांवर मोटार वाहन कायद्यांतर्गत दंडात्माक कारवाई करण्यात येते.

सन २०१३ ते जून २०१६ पर्यंत एकूण ५,३२,८३३ वाहनांवर दंडात्मक कार्यवाही करुन त्यांचेकडून रु.६,३९,६८,९३०/- एवढी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

(३) संबंध येत नाही.

---

## हिंगोली जिल्ह्यात अवैध धंदे तसेच जुगार सुरु असल्याबाबत

**(२५) ६४२७६ (२४-०८-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात सुरु असलेल्या अवैध धंद्यावर छापा सत्र सुरु असून सेनगांव, हट्टा, कळमनुरी, हिंगोली ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीत पाच ठिकाणी अवैध जुगारांवर छापे मारुन २८८३० रुपयांचा माल जप्त करण्यात आला असल्याचे माहे जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१७) :**(१) व (२) माहे जून, २०१६ मध्ये हिंगोली जिल्ह्यात सुरु असलेल्या अवैध धंद्यावर एकूण ६ ठिकाणी छापे टाकून त्यामध्ये एकूण १६ आरोपींना अटक करुन त्यांच्याकडून एकूण २२६८० रुपये रोख व जुगाराचे साहित्य असा माल जप्त करण्यात

आला आहे. तसेच अटक आरोपीविरुध्द सी.आर.पी.सी. कलम १०७, ११० प्रमाणे प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**ठाणे (पश्चिम) कोलबाड येथील सृष्टी सहकारी गृहनिर्माण संस्थेतील पदाधिकाऱ्यांवर गैरपध्दतीने दाखल केलेले गुन्हे रद्द करण्याबाबत**

**(२६) ६५०५९ (१०-११-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे (पश्चिम) कोलबाड येथील सृष्टी सहकारी गृहनिर्माण संस्थेतील वाहन पार्किंगबाबत सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांवर गैरपध्दतीने दाखल केलेले गुन्हे रद्द करण्याबाबत तसेच ज्या पोलीस अधिकाऱ्याने आपल्या अधिकाराचा गैरवापर करुन कायद्याचा भंग केला आहे. त्यांच्यावर कारवाई करण्याकरिता सोसायटीने याप्रकरणी मा.मुख्यमंत्री, मा.गृहराज्यमंत्री व अतिरिक्त मुख्य सचिव यांच्याकडे दिलेल्या लेखी तक्रारीच्या अनुषंगाने गृह विभाग, मंत्रालय यांनी दिनांक १६ जुलै, २०१६ रोजीच्या पत्रान्वये सह आयुक्त, पोलीस आयुक्तालय ठाणे, यांना या प्रकरणी चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्याबाबतचे लेखी आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच, या प्रकरणी मा.मुख्यमंत्री यांनी सभागृहात या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन दोषीविरुध्द कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सोसायटीवर झालेला अन्याय दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०२-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) होय.

सदरहू प्रकरणी पोलीस आयुक्त, ठाणे परिसरातील परिमंडळ-१ मधील राबोडी पो.स्टे. गुन्हा रजि. क्र. २/१६ भादंवि कलम ४४७, ३४ या गुन्ह्याबाबत “क” वर्गात समरी मंजुर होणे करिता मा.न्यायालयामध्ये अहवाल सादर केला आहे.

तसेच गुन्हा रजि. क्र.९६/१६ भांदवि कलम ३७९, ५११ प्रकरणी आरोपीचा शोध न लागल्याने गुन्ह्याची “अ” वर्ग समरीकरिता मा.न्यायलायात अहवाल सादर केला आहे.

तसेच सदर सोसायटीचे पदाधिकाऱ्यांचे विरोधातील गुन्ह्याचा नियमानुसार तपास करण्यात येऊन त्यांना वाहनपार्कींगचा वाद दिवाणी न्यायालयाकडून दाद मागुन घेण्याची समज देण्यात आली आहे व गुन्ह्याची अंतिम निर्गती करण्यात आलेली आहे. सदर गुन्ह्यांमध्ये सोसायटीचे पदाधिकाऱ्यांना नाहक त्रास देण्यात आलेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्थेचा (नीरी) सेवानिवृत्त वैज्ञानिकाने दत्तक घेतलेल्या मुलींवर बलात्कार केल्याबाबत**

**(२७) ६५२४५ (११-०१-२०१७). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्थेचा (नीरी) सेवानिवृत्त वैज्ञानिक मकसूद अन्सारी मेहंदीसन अन्सारी यांनी दत्तक घेतलेल्या तीन मुलींवर अनेक वर्षापासून बलात्कार करित असल्याची घटना दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तीनही पीडित मुलींचे अनुक्रमे वय १६, ११, ५ वर्षे असून पीडित मुलींनी दिलेल्या तक्रारीवरुन धंतोली पोलीसांनी गुन्हा दाखल करुन आरोपीला अटक करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०२-२०१७) :**(१) होय.

(२) होय,

(३) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन धंतोली अपराध क्रमांक १९८/२०१६ कलम ३७६ (२) (एफ) (आय) (जे) (एन) भादवि सहकलम ६,१०,१२ बालकांवरील लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबरनाथ (जि.ठाणे) चिखलोली येथे दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर न्यायालय स्थापन करण्याबाबत**

**(२८) ६५४९१ (१०-०१-२०१७). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) चिखलोली येथे दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठस्तर न्यायालय स्थापन करण्याकरिता जिल्हाधिकारी,ठाणे यांनी दिनांक १४ मार्च, २०१६ रोजी जमिनीचा आगाऊ ताबा दिलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर न्यायालय बांधकामाकरीता मुख्य वास्तू शास्त्रज्ञ, सा.बां.विभाग यांनी आराखडा तयार केला असून त्यानुषंगाने सा.बां.विभाग, ठाणे यांच्याकडून न्यायालयाचे अंदाज पत्रक तयार करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अंदाजपत्रक व आराखडे प्रमुख जिल्हा न्यायाधीश, ठाणे यांच्याकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आले असून अद्यापही त्यावर प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांच्याकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०२-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही. सदर न्यायालयाच्या बांधकामासाठीचे अंदाजपत्रक व आराखडे अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांचेकडून जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे यांना दि. २७/१/२०१७ रोजी प्राप्त झाले असून, जिल्हा न्यायालय, ठाणे यांनी सदर अंदाजपत्रक व आराखड्यांस शासनाची मान्यता प्राप्त करुन घेणे आवश्यक असल्याने त्यासाठी तसेच निधी उपलब्धतेसाठी प्रस्ताव मा. उच्च न्यायालय, मुंबई यांना दि. ३/२/२०१७ रोजी पाठविला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तळेगाव (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) येथे पाच वर्षाच्या मुलीवर बलात्काराचा प्रयत्न झाल्याबाबत**

**(२९) ६५७६५ (११-०१-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळेगाव (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) येथे पाच वर्षाच्या मुलीवर बलात्काराचा प्रयत्न झाल्याचे दिनांक ८ ऑक्टोबर, २०१६ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेचे तीव्र पडसाद उमटल्याने संतप्त जमावाने नाशिक-त्र्यंबकेश्वरसह मुंबई-आग्रा महामार्गावर ठिकठिकाणी रास्ता रोको आंदोलन करुन दगडफेक, जाळपोळी केल्याच्या घटना घडल्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आरोपीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०२-२०१७) :**(१) होय.
(२) होय.
(३) फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीवर आरोपी विधी संर्घषीत बालक याने दि. ८.१०.२०१६ रोजी बळजबरीने बलात्कार केला आहे. याबाबत त्र्यंबकेश्वर पोलीस स्टेशनला गुरनं.१९२/२०१६ भादवि कलम ३७६ सह कलम लैंगिक अल्याचारापासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम १२,४,६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आले आहे. आरोपी विधी संर्घषीत बालकास ताब्यात घेवून मा. बाल प्रधान न्यायमंडळ येथे हजर केले असता, सी.एफ.कस्टडी देण्यात आली आहे. आरोपीविरुध्द मा. बालप्रधान न्यायालयात दोषारोपत्र दाखल करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय वैद्‌यकीय महाविद्‌यालयामध्ये उपचाराकरिता दाखल झालेल्या गोरगरिब रुग्णांना महाराष्ट्रातील देवस्थानांना मिळणा-या देणगी मधून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३०) ६६३०३ (१०-०१-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय वैद्‌यकीय महाविद्‌यालयामध्ये उपचाराकरिता दाखल झालेल्या गोरगरिब रुग्णांवर उपचार करण्याकरिता महाराष्ट्रातील देवस्थानांना मिळणाऱ्या देणगी मधून ५० टक्के निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ ऑगस्ट, २०१६ रोजी निवेदनाव्दारे मा.मुख्यमंत्री यांचेकडे केलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

मा.मंत्री (जलसंपदा) यांनी मा.मुख्यमंत्री यांना अद्देशून दि.०८ जुलै, २०१६ रोजीच्या निवेदनाद्‌वारे सदर मागणी केली आहे.

(२) राज्यातील सर्व मुख्य देवस्थानांचा कारभार त्यांच्यासाठी बनविण्यात आलेल्या स्वतंत्र अधिनियमातील तरतूदीनुसरर विहित केलेल्या कार्यपध्दतीस अनुसरुन होत आहे. संबंधित अधिनियमांमध्ये केलेल्या तरतूदींनुसार बहुतांशी देवस्थानाच्या उत्पन्नाचा जवळजवळ निम्मा हिस्सा समाजोपयोगी कार्य व गोरगरीब रुग्णांना आर्थिक मदत तसेच विविध रुग्णालयांना वैद्‌यकीय उपकरणे खरेदी करण्यासाठी आर्थिक मदत, इत्यादींसाठी खर्च करण्यात येतो. यास्तव याबाबत वेगळी तरतूद करण्याची आवश्यकता नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालवण (जि.सिंधूदर्ग) येथील वसतिगृहांतील मुलांना बाहेर काढून वसतिगृहाचे रुपांतर विश्रामगृहात केल्याबाबत**

**(३१) ६६३२० (१६-०१-२०१७). श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण येथील (जि.सिंधुदूर्ग) माजी सैनिकांच्या मुलांच्या वसतिगृहातील मुलांना बाहेर काढून जिल्हा सैनिक कल्याण विभागाने वसतिगृहाचे रुपांतर विश्रामगृहात केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी तसेच वसतिगृहातील विद्‌यार्थ्यांनी तीव्र विरोध करुन सैनिक कल्याण विभाग (जि.सिंधूदर्ग) यांना माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०३-२०१७) :**(१) हे अंशत: खरे आहे.

मालवण (जि.सिंधुदुर्ग) येथील वसतिगृह हे माजी / शहीद सैनिकाच्या मुलांसाठी चालविण्यात येते. येथील वसतिगृहात बऱ्याच वर्षापासून माजी सैनिकांची केवळ १ किंवा २ मुले प्रवेश घेतात. त्यामुळे वसतिगृह चालविणे परवडत नाही. त्यामुळे, दिनांक २४ जून, २०१३ रोजी झालेल्या विशेष निधी (महाराष्ट्र) राज्य व्यवस्थापकीय समितीच्या कार्यकारी समितीच्या ९ व्या बैठकीत सदर वसतिगृहाचे रुपांतर सैनिक विश्रामगृहात करण्यात मान्यता देण्यात आली.
(२) याबाबतचे निवेदन प्राप्त झालेले नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात ९० हजार शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(३२) ६६३४४ (१०-०१-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शासकीय अधिकारी/कर्मचारी यांची सुमारे ९० हजार पदे रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पदे रिक्त असल्याने अधिकारी/कर्मचारी यांना अतिरिक्त काम करावे लागत असल्याने शासकीय कामे विहित वेळेत होत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अधिकारी/कर्मचारी यांची पदे भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०२-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सरळसेवेन पदभरतीबाबत शसनाने अंशत: निर्बंध आणले असले तरी विहित मर्यादेपेक्षा जास्त पदे भरावयाची असल्यास, प्रधान सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडून परवानगी दिली जाते. त्यानुसार या समितीने दि.२०.१.२०१७ पर्यंत २१८७७ पदे भरण्यास मंजूरी दिली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून देखील भरतीप्रक्रीया चालू असून लोकसेवा आयोगाकडून सन २०१७ चे स्पर्धा परीक्षेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आलेले आहे. याशिवाय पदोन्नतीने पदे भरण्याची प्रक्रीया पूर्णत: चालू आहे. सेवानिवृत्ती, मृत्यू व इत्यादि कारणांमुळे पदे रिक्त होणे व अशी पदे विहित पध्दतीनुसार भरली जाणे ही निरंतर चालणारी प्रक्रीया आहे.

---

**मौजे भादा (ता.औसा, जि.लातूर) येथील शेतकऱ्याने सावकाराच्या जाचास कंटाळून आत्महत्या केल्याबाबत**

**(३३) ६६५२४ (१७-०१-२०१७). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भादा (ता.औसा, जि.लातूर) येथील मृत शेतकरी महेश क्षीरसागर याने पिंपरी पुणे येथे सावकाराच्या दमदाटीने व जाचास कंटाळून आत्महत्या करीत असल्याचे आत्महत्येपूर्वी चिठ्ठीत नमूद करून आत्महत्या केल्या प्रकरणी संबधित सावकाराविरुध्द पोलीस ठाणे, भोसरी (जि.पुणे) येथे गुन्हा दाखल झाला असल्याचे दिनांक ११ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुन्ह्याचा तातडीने तपास पूर्ण करण्याबाबत तसेच आत्महत्या केलेल्या मृत शेतकऱ्याच्या कुटुंबास आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०३-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी भोसरी पोलीस स्टेशन येथे गु. र. क्र. २६०/२०१६ भादवि कलम ३०६,५०४, ५०६, ५०७ व महाराष्ट्र खाजगी सावकारी अधिनियम १९१४ चे कलम ४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्ह्यात एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. अटक आरोपी जामीनावर मुक्त असून सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे. तसेच, सदर मृत शेतक-याच्या कुटूंबास आर्थिक मदत देण्याबाबतची कार्यवाही तहसिल कार्यालय, औसा, जि. लातूर येथे प्रलंबित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वारळ (ता.म्हसळा, जि.रायगड) येथील अनुसूचित जातीच्या सरपंच यांना स्वातंत्र्यदिनी ध्वजवंदनापासून वंचित ठेवल्याबाबत

**(३४) ६६७१९ (१७-०१-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वारळ (ता.म्हसळा, जि.रायगड) येथील अनुसूचित जातीच्या सरपंच भारती संजय चांदोरकर यांना स्वातंत्र्यदिनी ध्वजवंदनापासून वंचित ठेवल्याप्रकरणी म्हसळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरपंचाऐवजी उप सरपंचांच्या हस्ते ध्वजवंदन करण्याचा बेकायदा ठराव मंजूर करुन त्यानुसार ग्रामपंचायत सदस्यांनी उप सरपंच विनोद कांबळी यांच्या हस्ते ध्वजवंदन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०२-२०१७) :**(१) होय.

(२) होय,

(३) सदर घटनेबाबत म्हसळा पोलीस ठाणे । का.गु.र.नं. ३७/२०१६ भादंवि कलम ३५४,५०४,३४ अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ चे कलम ३ (१) (आर)(एस)(डब्यू), ३ (१) (एम), ६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. गुन्ह्यातील चार आरोपींना अटक करण्यात आले असून आरोपींविरुध्द दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खापरखेडा (जि.चंद्रपूर) परिसरातील विद्यार्थीनीवर अतिप्रसंग करण्यात आल्याबाबत

**(३५) ६६७७८ (१७-०१-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खापरखेडा (जि.चंद्रपूर) परिसरातील तुलाराम ढोके वसतिगृहात एका युवकाने स्वयंपाकीणीच्या मदतीने १२ वर्षीय विद्यार्थीनीवर दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या सुमारास अतिप्रसंग केल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०२-२०१७) :**(१) होय.

(२) फिर्यादीच्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन खापरखेडा येथे अप. क्र ४४६/२०१६ कलम ३७६ (२) (ड), १०९, २०१, ३४ भादंवि व लैंगिक अपराधापासून बालकांचे सरक्षण अधिनियम, २०१२

कलम ४, ६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आले. आरोपी क्र. १ ला अटक करण्यात आले आहे. आरोपी क्र. २ विधीसंघर्ष बालक यास ताब्यात घेण्यात आले आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात गंभीर गुन्ह्यांची शिक्षा झालेल्या कैद्यांना पॅरोल किंवा फर्लोची सुट्टी बंद करण्याबाबत**

**(३६) ६६९९० (१६-०१-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बलात्कार, दरोडा अशा गंभीर गुन्ह्यांची शिक्षा भोगत असलेले पॅरोलवर रजेवर गेलेले २०० कैदी फरार असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बलात्कार आणि हत्या प्रकरणी शिक्षा झालेल्या कैद्यांना पॅरोल किंवा फर्लोची सुट्टी बंद करण्याचा निर्णय शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ च्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाच्या विचाराधीन असलेल्या निर्णयावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०२-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) शासन अधिसूचना दि. २६.०८.२०१६ नुसार अभिवचन रजा मंजूरी नियमातील तरतुदी अधिक परिणामकारक करुन बलात्कार किंवा बलात्कारासह हत्या या गुन्ह्यामध्ये शिक्षा भोगत असणाऱ्या बंद्याना संचित व नियमित अभिवचन रजेस अपात्र ठरविण्यात आले आहे.
(३) फरार बंद्याच्या विरुध्द भा.द.वि. कलम २२४ अंतर्गत गुन्हा दाखल करणे, फरार बंद्याची माहिती त्याच्या छायाचित्रासह स्थनिक वर्तमानापत्रात प्रसिध्द करणे तसेच पोलीस व कारागृह विभागाचे संकेतस्थळावर फरार बंद्याबाबत माहिती प्रसिध्द करण्याबाबत राज्यातील कारागृह अधिक्षकांना निर्देश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाचा आरक्षण कायदा आणि पदोन्नतीमधील आरक्षण संबंधिचे परिपत्रक घटनाबाहय ठरविल्याबाबत**

**(३७) ६७००१ (१०-०१-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या आरक्षण कायदा आणि पदोन्नतीमधील आरक्षण संबंधिचे परिपत्रक घटनाबाह्य ठरविणारा महाराष्ट्र प्रशासकीय न्याधिकरणाचा (मॅट) निर्णय उच्च न्यायालयाने रद्द ठरविला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, न्यायालयाच्या निर्णयानुसार सदर परिपत्रक मागे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०१-२०१७) :**(१) होय,
(२) व (३) महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती,) भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम २००१ हा राज्यात दि. २९.१.२००४ पासून लागू करण्यात आलेला आहे. सदर आरक्षण अधिनियमाविरुध्द याचिका क्र.८४५२/२००४ (विजय घोगरे व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन) यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केली होती. मा. उच्च न्यायालयात सदर याचिके प्रकरणी वेळोवेळी झालेल्या सुनावण्यानंतर, दि. १८.६.२०१३ रोजी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई यांनी दि. २८.११.२०१४ रोजी दिलेल्या निर्णयान्वये आरक्षण कायदा-२००१ व यासंदर्भातील दि. २५.५.२००४ चा शासन निर्णय रद्द ठरविला होता. तथापि मा. न्यायाधिकरणाने आपल्या स्वत:च्याच आदेशास एक वर्षाची स्थगिती दिली असल्याने, सद्यस्थितीत आरक्षण अधिनियम २००१ ची अंमलबजावणी पुर्ववत सुरु आहे.

प्रस्तुत प्रकरणी शासनाच्या वतीने मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.२७९७/२०१५ अन्वये अपिल दाखल केले असून सदर प्रकरणी दि. २३.४.२०१५ रोजी मा. उच्च न्यायालयाने अंतरिम आदेशान्वये मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधिकरणाच्या दि. २८.११.२०१४ च्या निर्णयास स्थगिती दिली आहे. या प्रकरणी मा. उच्च न्यायालयात अंतिम सुनावणी पूर्ण झाली आहे. मा. न्यायमुर्ती अनुप मोहता यांनी दि.२५.७.२०१६ रोजी आपला निर्णय दिला होता. याप्रकरणी पुन्हा दि. २३.९.२०१६ रोजी व्दिखंडपीठासमोर सुनावणी पूर्ण झाली असून दुसरे न्यायाधीश मा. न्यायमूर्ती श्री.ए.ए. सय्यद यांनी आपला निर्णय दि.२१.१२.२०१६ रोजी दिलेला आहे. परंतु दोन न्यायमूर्तींच्या निर्णयामध्ये मतभिन्नता असल्याने, सदर प्रकरण अन्य न्यायमुर्ती श्री.सोनक यांच्याकडे सुनावणीसाठी ठेवण्यात आले असून त्यांच्याकडे दि.७.२.२०१७ दि.२०.२.२०१७ दि.२.३.२०१७ व दि.१६.३.२०१७ रोजी सुनावणी झालेली आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

---

**रुपुर तांडा (ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली) परिसरातील अवैध दारुविक्री बंद करण्याबाबत**

**(३८) ६७०९१ (११-०१-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रुपुर तांडा (ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली) परिसरातील अवैध दारुविक्री बंद करण्याबाबतची मागणी ग्रामस्थांनी प्रशासनाकडे केल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परिसरात अवैध दारु विक्री बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१७)** :(१) ग्रामपंचायत रुपुर तांडा यांनी अवैध दारु विक्री बंद करण्याबाबत सर्वानुमते ठराव मंजूर केला होता. परंतू याबाबत पोलीस स्टेशनला तक्रार दाखल करण्यात आलेली नाही.
(२) हिंगोली जिल्हा पोलिसांनी रुपुर तांडा येथे दि.१६/०७/२०१६, दि.२०/०८/२०१६, दि.२७/१०/२०१६ व दि.०५/१२/२०१६ रोजी अवैध दारु विक्रेत्यावर छापा टाकण्यात आला परंतु अवैध दारु मिळून आली नाही.
(३) विलंब झालेला नाही.

---

**वाशिम जिल्हयात मोठया प्रमाणात अवैध धंदे सुरु असल्याबाबत**

**(३९) ६७२८२ (१७-०१-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम शहरातील एका नामांकित हॉटेलमध्ये सेक्स रॅकेट सुरु असल्याचे माहे सप्टेंबर/ऑक्टोबर, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आल्यावर स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांनी आर्थिक गैव्यवहार करुन दोषींना सोडल्याचे निदर्शनास आल्यामुळे पोलिस अधिक्षक, वाशिम यांनी सदर प्रकरणाची चौकशी एस.पी. मंगरुळपीर यांचेकडे दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच वाशिम जिल्हयात मोठया प्रमाणात खुलेआम जुगार, सट्टा बाजार चालत असल्याचेही माहे सप्टेंबर, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणांची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०२-२०१७)** :(१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) दैनिक पुण्यनगरी या वृत्तपत्राचे वाशिम आवृत्तीमध्ये दि. ३०.९.२०१६ रोजी व दि.१.१०.२०१६ रोजी प्रसिध्द झालेल्या बातम्याच्या अनुषंगाने चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत उप विभागीय पोलीस अधिकारी, उप विभाग, मंगरुळपीर यांना पोलीस अधिक्षक, वाशिम कार्यालयामार्फत आदेश देण्यात आले होते. शहरातील अतिनामांकीत **हॉटेल मणिप्रभा व वाशिमकर हॉटेल** मध्ये चौकशी करुन अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये अशा प्रकारची कुठलीही घटना घडल्याबाबत कोणताही ठोस पुरावा मिळून आलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मिरज (जि.सांगली) येथील अत्याचार पिडीत महिलेची तक्रार नोंदवून न घेता खंडणीचा गुन्हा दाखल केल्याबाबत**

**(४०) ६७५८९ (१६-०१-२०१७). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरज (जि.सांगली) शहरातील अत्याचार पिडीत विवाहित महिलेची फिर्याद नोंदवून घेण्याऐवजी तिच्यावरच खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आल्याने सदर महिलेने दिनांक ६ ऑगस्ट, २०१६ रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी लोकप्रतिनिधी तसेच महिला आयोगाच्या अध्यक्षांनी पोलीस अधिक्षक, सांगली यांची भेट घेऊन वस्तुस्थिती निदर्शनास आणून दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी संबंधितांवर तसेच खोटा गुन्हा दाखल करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०२-२०१७) :**(१) होय.

(२) होय, महिला आयोगाच्या अध्यक्षांनी पोलीस अधिक्षक सांगली यांची भेट घेतली आहे.

(३) अत्याचार पिडीत विवाहीत महिला दि. १७.६.२०१६ रोजी माहेर मिरज येथे आली होती. ती मिरज एस.टी.स्टँड येथे आली असता, तीला नात्याने आत्ये भाऊ असलेला आरोपीने त्याच्या चार चाकी वाहनातून तिच्या चुलत्याकडे सोडतो असे बतावणी केली. परंतू आरोपीने पिडीत विवाहीत महिलेला त्याच्या मिरज येथील शेतातील घरात घेवून गेला व तिच्यावर जबरदस्तीने बलात्कार केला व दि. २०.६.२०१६ पर्यंत डांबून ठेवून बलात्कार केला आहे. आरोपीने धमकी दिल्याने पिडीत महिलेने भितीपोटी तक्रार दिली नव्हती. पिडीत महिलेने दि. ६.७.२०१६ रोजी मिरज शहर पोलीस ठाणेस दिलेल्या फिर्यादीवरुन मिरज शहर पोलीस ठाणे भाग-५ गु.र.नं. २५७/२०१६ भा.दं.वि कलम ३७६,३४१,५०६ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आले असून, आरोपीविरुध्द मा. न्यायालयात दोषादोपपत्र पाठविले आहे.

सदर गुन्हा दाखल झालेनंतर पिडीत महिला आरोपीच्या मिरज येथील घरात अनाधिकाराने राहिली होती. पिडीत महिलेला आरोपीच्या आईवडील यांनी घर सोडून जाण्याची विनंती केली असता, पिडीत महिलेने आरोपीवर बलात्काराची केस घातली असून, तुमच्याविरुध्दही केस दाखल करुन टाकेन व घरातून निघून जाणार नसून उपजिवेकसाठी दहा लाख रुपये द्या नाहीतर आत्महत्या करीन अशी खंडणी मागून धमकी दिली. आरोपीच्या आईने पिडीत महिलेविरुध्द दि. ६.८.२०१६ रोजी दिलेल्या तक्रारीवरुन महात्मा गांधी चौक

पोलीस ठाणे भाग - ५ गु.र.नं ०/२०१६ भा.दं. वि. कलम ४५२,३८४,५०४,५०६ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. सदर घटना मिरज शहर पोलीस ठाणे अंतर्गत असल्याने गुन्हा पुढील तपासकामी मिरज शहर पोलीस ठाणेकडे वर्ग करण्यात आला. याप्रकरणी मिरज शहर पोलीस ठाणेस गु.र.नं. २८०/२०१६ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या तपास सुरु असताना पिडीत विवाहीत महिलेला तिच्यावरील गुन्ह्याबाबत माहिती मिळाल्यानंतर तिने दि. ६.८.२०१६ रोजी आरोपीच्या शेतातील घराचे स्वचपांक खोलीत आपल्या ओढणीने छताचे अँगलला गळफास लावून आत्महत्या केली आहे.

पिडीत विवाहीत महिलेवर गुन्हा दाखल करणारे पोलीस निरीक्षक व एक पोलीस कर्मचारी यांना सेवेतून निलंबनाची कार्यवाही केली आहे. गुन्ह्याचा तपास स्थानिक गु.अ. शाखा, सांगली यांचेकडे वर्ग केला आहे. पिडीत विवाहित महिलेस आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले म्हणून आरोपी व त्याचे आईवडील असे तीने आरोपीविरुध्द दि. ७.८.२०१६ रोजी मिरज शहर पोलीस ठाणे येथे भाग -५ गु.र.नं. २८१/२०१६ भा.दं.वि. कलम ३०६, ५०६,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तीनही आरोपीना अटक करण्यात आले आहे. आरोपींनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे सीआरपीसी ४८२ प्रमाणे दाखल एपीएल नं. १०६८/२०१६ अन्वये सदर गुन्ह्याचा तपास सुरु ठेवला परंतु न्यायालयाच्या परवानगीशिवाय दोषारोपपत्र दाखल करणेत येवू नये असे आदेश दिलेले आहेत. गुन्ह्याचा तपास सरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इतर मागासवर्ग प्रवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत प्रत्येक टप्प्यावर पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्याबाबत**

**(४१) ६७७८३ (१०-०१-२०१७). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इतर मागासवर्ग प्रवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत प्रत्येक टप्प्यावर पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्याबाबत सन २०११ पासून लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०३-२०१७) :**(१) होय.
(२) व (३) आरक्षण २००१ मधील तरतुदीनुसार "पदोन्नतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यावर असेल अशी तरतूद करण्यात आली आहे. याबाबत शासन निर्णय २५ मे, २००४ अन्वये पदोन्नतीचे आरक्षण विहित करण्यात आले आहे. पदोन्नतीच्या आरक्षणामध्ये इ.मा.व प्रवर्गात आरक्षण ठेवण्यात आले नाही. राज्यात सध्या मागासवर्गीयांकरिता सरळसेवेमध्ये ५२% इतके आरक्षण विहीत करण्यात आलेले असून इ.मा.व प्रवर्ग करीता १९% एवढे आरक्षण

विहित केलेले आहे. ओबीसी प्रवर्गास पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्यासंदर्भात ॲडव्होकेट जनरल यांचे अभिप्राय २ ते ३ वेळा अभिप्राय/मत घेण्यात आले. त्यांनी दिलेले अभिप्राय थोडक्यात पुढीलप्रमाणे आहेत:-

"भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १६ (४) नुसार शासन सेवेत आरक्षण ठेवण्यात येते. या तरतूदीनुसार राज्य शासन, ज्या मागास प्रवर्गाचे प्रतिनिधित्व पुरेशा प्रमाणात नाही अशा मागास प्रवर्गाकरिता शासन सेवेत आरक्षण ठेवू शकते. संविधानातील अनुच्छेद १६(४) (ए) च्या तरतुदीनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती करिता पदोन्नतीमध्ये राज्य शासन आरक्षण ठेवू शकते. त्यामुळे इतर मागास प्रवर्गाकरिता पदोन्नतीमध्ये आरक्षण ठेवण्यासाठी अनुच्छेद १६ (४) (ए) नुसार राज्य शासन सक्षम नाही. त्यामुळे उपरोक्त अधिनियमाच्या तरतुदीनुसार पदोन्नतीमधील आरक्षण इतर मागास प्रवर्गासाठी लागू आहे असा अन्वयार्थ घेतल्यास ते संविधानाच्या तरतुदीच्या विरोधात ठरेल.

प्रस्तुत प्रकरणी पुन्हा ॲटार्नी जनरल ऑफ इंडिया यांचे अभिप्राय मागविण्यात यावेत असे मा.मुख्यमंत्री यांचे स्तरावर निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार त्यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आले होते. त्यांनी दिलेले अभिप्राय थोडक्यात खालीलप्रमाणे आहेत.

सन २००४ च्या अधिनियमान्वये अथवा त्यासाठी सुधारणा करुन अथवा कोणतेही प्रशासकीय आदेश निर्गमित करुन इतर मागास प्रवर्गास पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्यात आल्यास ती कृती भारताच्या संविधानातील तरतुदींचे विशेष करुन अनुच्छेद १६ (४अ) मधील तरतुदीचे उल्लंघन करणारी ठरेल. तसेच ती कृती मा. सर्वोच्च न्यायालयाच्या एम.नागराज प्रकरणी दिलेल्या न्यायनिर्णयाशी विसंगत होईल, असे अभिप्राय दिले आहेत.

आरक्षण अधिनियम २००१ व दि. २५.५.२००४ अनुसार देण्यात आलेले पदोन्नतीतील सर्व टप्प्यावरील आरक्षणाबाबतचे शासन आदेश मा. प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी दि. २८.११.२०१४ रोजीच्या आदेशान्वये रद्दबातल ठरविले आहेत. मा. प्रशासकीय न्यायधिकरणाच्या निर्णया विरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे राज्य शासनाच्या वतीने याचिका क्र. २७९७/२०१५ दाखल करण्यात आली असून, सदर याचिकेवर दि. २०.३.२०१५ रोजी सुनावणी होऊन मा. उच्च न्यायालयाने प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या आदेशाला स्थगिती दिली होती. सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयात अंतिम सुनावणी पूर्ण झाली आहे. मा.न्यायमुर्ती मोहता यांनी दिनांक २५.७.२०१६ रोजी आपला निर्णय दिला होता. या प्रकरणी पुन्हा दि. २३.९.२०१६ रोजी व्दिखंडपीठासमोर सुनावणी घेण्यात आली तद्नंतर दुसरे न्यायाधिश श्री.सय्यद यांनी आपला निर्णय दि. २१.१२.२०१६ रोजी दिलेला आहे. दोन न्यायमुर्तीच्या निर्णयामध्ये मत भिन्नता असल्याने, सदर प्रकरण मा.मुख्य न्यायधिश महोदयांकडे पुढील उचित आदेशाकरिता ठेवण्यात आले आहे.

---

**ठाणे जिल्हयातील सत्यमेव जयते या सामाजिक संस्थेने**
**राष्ट्रध्वजाचा लोगो वापरुन अवमान केल्याबाबत**

**(४२) ६८४१८ (१६-०१-२०१७). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील सत्यमेव जयते या सामाजिक संस्थेने मानवी हक्क गैरव्यवहार विरोधी समिती स्थापन करुन संस्थेचा लोगो म्हणून राष्ट्रध्वजाचा वापर करुन अवमान केल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ जून, २०१६ रोजी वा त्या दरम्यान चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेने लोगो वापरताना कुठल्याही सक्षम प्राधिकरणाची परवानगी घेतली नसल्याने त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी देखील करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त संस्थेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०३-२०१७) :**(१) हे खरे आहे.

ठाणे पोलीस आयुक्त, परिसरातील परिमंडळ ५ मधील कापूरबावडी पोलीस ठाण्यात सन २०१५ मध्ये सत्यमेव जयते या सामाजिक संस्थेने मानवी हक्क गैरव्यवहार विरोधी समिती स्थापन करुन संस्थेचे लोगो म्हणून राष्ट्रध्वजाचा वापर करुन अवमान केलयाबाबत १ गुन्हा दाखल आहे.

(२) लोगो वापरताना कुठल्याही प्राधिकरणाची परवानगी घेण्यात आलेली नव्हती.

(३) कापूरबावडी पोलीस ठाण्यात सन २०१५ मध्ये गु.र.नं. ३०८९/२०१५, द प्रिपेन्सन ऑफ इन्सल्ट टु नॅशनल ऑनर ॲक्ट १९७१ चे कलम २ प्रमाणे दि.२४.०९.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला असून सदर गुन्ह्यात १ आरोपीस अटक करण्यात आलेली असून सदर गुन्हा सध्या तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हिंगोली जिल्हापरिषदेच्या संभाजीनगर इंग्रजी शाळेचा शिक्षक इसिस या क्रुर दहशतवादी संघटनेचा अतिरेकी असल्याबाबत

**(४३) ६८५१७ (११-०१-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हा परीषदेच्या संभाजीनगर या इंग्रजी शाळेचा शिक्षक “इसिस” या दहशतवादी संघटनेचा दहशतवादी असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नन्‌सार सदर शिक्षकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हिंगोली जिल्ह्यातील जिल्हा परिषद बहुविध प्रशाला, शिवाजीनगर, हिंगोली येथील शिक्षक मोहम्मद रईसोद्दीन मोहम्मद सिध्दीक, रा.आजम कॉलनी, हिंगोली हा बंदी घातलेल्या इसिस संघटनेचा सदस्य असल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे. त्यांनतर त्यांस द.वि.प.पो.स्टे. काळाचौकी, मुंबई अप क्र.०८/२०१६ रोजी भा.दं.वि. कलम १२० (ब), ४७१ भा.दं.वि. सह कलम १३, १६, १८, १८ (ब), २०, ३८, ३९ बेकायदेशीर हालचाली (प्रतिबंध) अधिनियम सह कलम ४, ५, ६ या गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यात एकूण चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींविरुध्द कोर्ट केस क्र. १०६३/२०१६ अन्वये दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास राष्ट्रीय तपास यंत्रणा, मुंबई यांचेकडून करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली शहरातील नागरी वस्तीत असणाऱ्या पोल्ट्री व्यवसायाबाबत

**(४४) ७००४८ (१६-१२-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली शहरातील नागरी वस्तीत असणाऱ्या पोल्ट्री व्यवसायामुळे घाण, दुर्गंधी व माशांचा त्रास वाढल्याने आरोग्य धोक्यात आले असून पोल्ट्री व्यवसाय तातडीने बंद करावा अशी मागणी नागरी हक्क जागृती संघटनेने मुख्याधिकारी यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०३-२०१७) :**(१) हे खरे नाही.

पोल्ट्री व्यवसायामुळे घाण, दुर्गंधी व माशंचा त्रास वाढल्याने पोल्ट्री व्यवसाय बंद करावा अशी कोणतीही तक्रार सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेकडे प्राप्त झालेली नाही.

परंतू या बाबत नागरी हक्क जागृती संघटनेने मुख्याधिकारी, विटा नगरपरिषद यांच्याकडे अशा प्रकारची मागणी केलेली आहे.

(२) विटा नगरपरिषद हद्दीतील रहिवाशी भागातील पोल्ट्री धारकांना पोल्ट्री व्यावसाय बंद करुन सदर इमारती काढुन टाकण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२ व ५३ नुसार संबंधितांना नोटीस देण्यात आल्या होत्या. परंतू संबंधितांनी सदर नोटीसच्या विरोधात दिवाणी न्यायालय विटा येथे दावा दाखल केल्याने पुढील कार्यवाही प्रलंबित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंदगड तालुक्यातील (जि.कोल्हापूर) ए.व्ही.एच केमीकल्स हलकर्णी एमआयडीसी कंपनी विरोधातील अंदोलकावरील फौजदारी केसेस मागे घेण्याबाबत

**(४५) ७११३३ (११-०१-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड तालुक्यातील (जि.कोल्हापूर) येथील ए.व्ही.एच केमीकल्स हलकर्णी एमआयडीसी कंपनी विरोधातील आंदोलकांवर दाखल केलेल्या फौजदारी केसेस मागे घेण्याबाबतची मागणी मा.मुख्यमंत्री यांचेकडे चंदगड येथील लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ जुलै, २०१६ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०३-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) चंदगड पोलीस ठाण्यात एकूण १२ गुन्हे व शाहुपूरी पोलीस ठाण्यात १ गुन्हा असे एकूण १३ गुन्हे दाखल आहेत. राजकीय व सामाजिक आंदोलनातील खटले काढून घेण्याबाबत शासन निर्णय गृह विभाग दि. १४.३.२०१६ अन्वये यासंदर्भात सूचना निर्गमित केल्या आहेत. या शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीने चंदगड पोलीस ठाण्यामधील १२ गुन्ह्यांपैकी १ गुन्हा यापुर्वीच पात्र ठरविला असून त्याबाबत न्यायालयीन कार्यवाही सरु आहे. शाहुपूरी पोलीस ठाण्यातील १ गुन्हा समितीने अपात्र ठरविला असून उर्वरित ११ खटले समितीसमोर ठेवण्याची प्रक्रिया चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळकोट (जि.लातूर) येथे नवीन तालुकास्तरीय न्यायालय मंजूर करण्याबाबत

**(४६) ७१६९७ (१०-०१-२०१७). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळकोट (जि.लातूर) येथे उदगीर उपजिल्हा सत्र न्यायालय अंतर्गत असलेल्या ग्राम न्यायालयामार्फत आठवडयातील दोन दिवस न्याय निवाडे होतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वतंत्र न्यायालया अभावी जळकोट तालुक्यातील अनेक न्याय निवाडे प्रलंबीत असल्यामुळे जळकोट येथे नवीन तालुकास्तरीय न्यायालय मंजूर करण्यात यावे अशी मागणी माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जळकोट येथे तालुकास्तरीय न्यायालयाची निर्मिती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०३-२०१७) :**(१) हे खरे नाही. प्रत्येक आठवड्याच्या बुधवारी जळकोट, जि.लातूर येथे ग्रामन्यायालयाचे कामकाज चालते.
(२) होय, हे खरे आहे.
(३) राज्यात कोठे न्यायालय स्थापन करावयाचे याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे स्तरावर गठीत The Establishment of Courts Committee यांचे स्तरावर निर्णय घेण्यात येऊन त्यानुसार शासनास शिफारस करण्यात येते व तद् नंतर मंत्रीमंडळ स्तरावर न्यायालय स्थापनेचा निर्णय घेण्यात येतो. दि.०२/०५/२०१६ रोजीच्या पत्रान्वये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या The Establishment of Courts Committee या समितीसमोर निर्णयार्थ प्रकरण सादर करण्याबाबत प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील फोर्ट येथील बॉम्बे हाऊसमध्ये टाटा समुहाच्या सुरक्षा रक्षकांनी वृत्तपत्रकार छायाचित्रकारांना मारहाण केल्याबाबत

**(४७) ७२०४८ (११-०१-२०१७). अॅड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील फोर्ट येथील बॉम्बे हाऊसमध्ये टाटा समुहाच्या सुरक्षारक्षकांनी 'मिड डे' चे ज्येष्ठ फोटोग्राफर अतुल कांबळे, 'टाइम्स ऑफ इंडिया' चे शांतकुमार आणि 'हिंदुस्थान टाइम्स' हरजित सिंह या वृत्तपत्रकार छायाचित्राकारांना मारहाण केल्याचे दिनांक ४ नोव्हेंबर, २०१६ च्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वृत्तपत्रकारांना मारहाण करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०३-२०१७) :**(१) होय हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २८२/२०१६ भा.द.वि. कलम १४१,१४३,१४७,१४९,३२३,३२५,४२७ सह मुंबई पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) सह १३५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याबाबत ७ आरोपींना अटक करण्यात आली असून सर्व अटक आरोपी जामिनावर मुक्त आहेत. सदर प्रकरणी मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली शहरातील औद्योगिक वसाहतीतील पोलीस चौकीत एकही**
**पोलीस कर्मचारी तैनात नसल्याबाबत**

**(४८) ७२०५८ (११-०१-२०१७). श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली शहरातील औद्योगिक वसाहतीतील पोलीस चौकीत गत एक वर्षापासून एकही पोलीस कर्मचारी तैनात केला नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसाहतीत ५० ते ६० कारखाने तसेच सोयाबीन तेलासह विविध शासकीय विभागाचे उद्योग असून सदर परिसरात छोट्या-मोठ्या चोऱ्या नेहमी होत असून उद्योजकांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष होत असल्याने तेथील उद्योजकांकडून संताप व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त परिसरातील सुरक्षेच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०३-२०१७) :**(१) हिंगोली शहरातील औद्योगिक वसाहतीत पोलीस चौकी असून तेथे ३ पोलीस कर्मचाऱ्यांची पेट्रोलिंगसाठी नेमणूक केली आहे.

(२) सदर औद्योगिक वसाहतीत दिवसरात पेट्रोलींग असल्यामुळे चोऱ्यांवर आळा बसला असून सन २०१६ मध्ये चोरीचा एक गुन्हा नोंद झाला आहे.

(३) सदर औद्योगिक वसाहतीत क्षेत्रीय कार्यालयाकडून दिवसरात्र पेट्रोलींग करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भातील युवकांचे शासकीय व निमशासकीय नोकऱ्यांमधील प्रमाण वाढविण्याबाबत**

**(४९) ७२११२ (१०-०१-२०१७). डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे दिनांक २८ सप्टेंबर, १९५३ रोजी झालेल्या करारानुसार विदर्भातील युवकांना २३ टक्के शासकीय व निमशासकीय नोकऱ्या देण्याचा करार झाला असून सद्यस्थितीत २३ टक्के ऐवजी २-३-४ टक्के शासकीय व निमशासकीय नोकऱ्या दिल्या असल्यामुळे गत ६० वर्षापासुन सुमारे ४ लाख नोकऱ्यांचा अनुशेष निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सन २०११ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष डॉ.सुधीर ठाकरे यांनी मा.राज्यपाल महोदयांना पत्र लिहुन वस्तुस्थिती निदर्शनास आणुन दिली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भातील युवकांचे शासकीय व निमशासकीय नोकऱ्यांमध्ये प्रमाण वाढवण्यासाठी नागपुर व अमरावती येथे मुंबई, पुणेच्या धर्तीवर यशदा व एम.आय.सी. सारख्या संस्था उभारणे तसेच विदर्भातील ११ जिल्हयात एम.पी.एस.सी. ट्रेनिंग सेंटर सुरु करणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०२-२०१७) :**(१) नागपूर येथे दिनांक २८ सप्टेंबर, १९५३ रोजी झालेल्या करारामध्ये शासनाकडील व शासन नियंत्रित उपक्रमामधील सर्व श्रेणीतील नोकरभरतीच्यावेळी संबंधीत घटकांना लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व देण्याची तरतूद करण्यात आलेली असून सदरहू करारामध्ये विशिष्ट टक्केवारी प्रमाणे प्रतिनिधीत्व देण्याची तरतूद केलेली नाही. त्यामुळे टक्केवारीच्या प्रमाणानुसार ४ लाख नोकऱ्यांचा अनुशेष निर्माण झाला आहे असे म्हणणे योग्य ठरणार नाही.
(२) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे तत्कालीन अध्यक्ष डॉ.सुधीर ठाकरे यांनी शासकीय सेवेतील उमेदवारांच्या भरतीमधील विभागीय असमतोलाबाबतची वस्तुस्थिती दि.४.२.२०१४ च्या पत्रान्वये मा.राज्यपाल महोदयांच्या निदर्शनास आणून दिली होती.
(३), (४) व (५) राज्य शासकीय कार्यालये आणि राज्य शासन नियंत्रित उपक्रमामधील नोकर भरतीत विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या तीनही विभागांना लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व प्राप्त झाले आहे किंवा कसे, याबाबत अभ्यास करुन प्रभावी उपाययोजना सुचविण्यासाठी मा.मंत्री (वित्त आणि नियोजन, वने) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळ उप समिती गठीत करण्यात आली आहे. सदरहू समितीचा अहवाल अद्यापि प्राप्त झालेला नाही.

---

**राज्यातील पोलीस शिपायांची आंतर जिल्हा बदली सेवा नियमात बदल करण्याबाबत**

**(५०) ७२५३० (११-०१-२०१७). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०११ या वर्षानंतर भरती झालेल्या पोलीस शिपायांची आंतरजिल्हा बदली केली जाणार नाही असा जाचक सेवा नियम शासनाने लागू केल्यामुळे पोलिसांमध्ये प्रचंड असंतोष पसरला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलीस शिपायांची आंतर जिल्हा बदली रद्द करण्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच शासन याबाबत पुर्नविचार करुन पोलिसांना दिलासा देणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०३-२०१७)** :(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग चार-ब, दिनांक १६-६-२०११ अन्वये पोलीस शिपाई पदाच्या सेवाप्रवेश नियमांतील नियम क्रमांक ११ अन्वये **पोलीस शिपाई पदावर उमेदवारांस ज्या घटकांत नियुक्ती देण्यात आलेली आहे. त्या घटकाव्यतिरिक्त इतर पोलीस घटकांत त्यांची बदली करता येणार नाही, अशी तरतूद विहित करण्यात आलेली आहे.**

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.